ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १६ नोव्हेंबर, १९६० | अंक ४१

## विविध माहिती

**नवीन प्रकारचा बाँब**—बड्या राष्ट्रांच्या शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेत आणखी एक नव्या प्रकारचा बाँब जन्माला येण्याची शक्यता आहे. अणुशास्त्रज्ञांच्या परिभाषेत त्याला ‘ न्यूट्रॉन बाँब ’ म्हणतात. ह्या बाँबच्या वापरांत भयंकर स्फोट होऊन आगी लागण्याचा धोका नाहीं. मात्र तो उपयोगांत आणला म्हणजे जीविताला घातक असे किरण बाहेर पडतील. तो आकारानेंहि फारसा मोठा असणार नाहीं.

**आर्थिक मागासलेपणाची दखल**—पंजाबमध्यें वर्गीकृत जाती व मागासलेल्या जाती ह्यांना बऱ्याच सवलती दिल्या जातात. अशाच सवलती आतां दरमहा १०० रुपये अगर त्याहून कमी पगार मिळविणाऱ्या लोकांना देण्यांत येणार असल्याचें पंजाबच्या मुख्य मंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. आर्थिक मागासलेपणा हीच कसोटी सवलतीसाठी ग्राह्य धरण्यांत येणार आहे.

**बढतीसाठी प्रयत्न**—दिल्ली येथें राज्य सरकारांच्या शिक्षण-मंत्र्यांची परिषद नुकतीच भरली होती. परिषदेंत बोलतांना मध्यवर्ती शिक्षणमंत्री डॉ. श्रीमाली ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं देशाच्या कांहीं भागांत शिक्षकांनीं शिपाई म्हणून बढती मिळ-विण्याचे प्रयत्न केले. कारण त्या भागांत शिक्षकांपेक्षा शिपायांना अधिक वेतन मिळत आहे.

**दंतवैद्यकाचें महत्त्व**—पाटणा येथें अखिल भारतीय दंत-वैद्यक मंडळाचें २४ वें अधिवेशन भरलें होतें. परिषदेचे अध्यक्ष बिहारचे आरोग्यमंत्री श्री. पटेल हे होते. त्यांनीं आपल्या भाषणांत दंतवैद्यकाचा धंदा खोट्या दंतवैद्यांच्या हातीं जातां कामा नये असें सांगितलें. वाईट दांत हे रोगांचें मूळ असल्याचेंहि त्यांनीं विशद केलें.

**सर्वोदयवाद्यांची मोहीम**—इंदूर येथील सर्वोदय कार्यकर्त्यांनीं अश्लील भित्तीचित्रांविरुद्ध मोहीम सुरू केली आहे. इंदूरच्या रेल्वे-स्टेशनवर तरुण-तरुणींच्या आलिंगनाचें एक सिनेचित्र लावण्यांत आलें होतें. सर्वोदय कार्यकर्त्यांनीं स्टेशनवर जाऊन चित्राला विधि-पूर्वक आहुति दिली. सिनेमाक्षेत्रांतील धंदेवाल्यांनीं हे कृत्य मूलभूत हक्कावर गदा आणणारे आहे अशी तक्रार केली आहे.

**जपान अधिक सहकार्य देणार**—जपानमधील पोलादाच्या धंद्याचें एक प्रतिनिधीमंडळ भारताचा दौरा करीत आहे. भारता-मधील पोलादाच्या कारखान्यांना ते भेट देईल. भारताबरोबर अधिक सहकार्य करण्याचे मार्ग ते शोधणार आहे. तिसऱ्या पंच-वार्षिक कार्यक्रमाच्या कालांत जपान भारताकडून ८० लाख टन लोखंडाचे खनिज घेणार आहेत.

**अमेरिकन प्रवाशांची वाढती संख्या**—गेल्या वर्षी भारतांत आलेल्या परदेशीय प्रवाशांच्या एकूण संख्येपैकी जवळ जवळ २० टक्के प्रवासी अमेरिकेंतील होते, असें आढळून आलें आहे. जकातीचीं बंधनें शिथिल केली व सवलतींची वाढ केली तर अमेरिकेंतून भारतांत येणाऱ्या प्रवाशांची संख्या खूपच वाढेल असा अंदाज आहे.

**जगाच्या अंताचें भविष्य**—अमेरिकेंतील इलिनॉइस विद्या-पीठांतील शास्त्रज्ञांनीं गणितशास्त्राच्या आधारानें असें भविष्य वर्तविलें आहे कीं आणखी ६६ वर्षांनीं जगाचा अंत होईल. ह्याला कारण बेसुमार वाढलेली लोकसंख्या. माणसाला खायला न मिळाल्यामुळें, रोगानें अगर घातक किरणांनीं तो मरणार नाहीं; तर केवळ चेंगराचेंगरी होऊन माणूस नष्ट होईल, असें त्यांचें मत आहे.

**हिंदी ग्रंथकाराचें यश**—लंडन येथील एका प्रकाशन संस्थेनें श्री. सुरेश वैद्य ह्या हिंदी लेखकानें लिहिलेल्या ‘ आयलँडस ऑफ दि मॅरिगोल्ड सन ’ ह्या पुस्तकाचे प्रकाशन केलें आहे. ह्या संस्थे-तर्फे दरमहा एका उत्कृष्ट पुस्तकाचें प्रकाशन केलें जातें. हिंदी ग्रंथकाराला हा मान मिळण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. पुस्तक अंदमान व निकोबार ह्या बेटांविषयीं आहे.


**चंद्राची दुसरी बाजू**—४ ऑक्टोबर, १९६० ह्या दिवशीं रशिआनें चंद्राभोंवतीं फिरणारा उपग्रह सोडला व त्याच्या साह्यानें चंद्राच्या दुसऱ्या बाजूचीं छायाचित्रें काढली. आतां ह्या छाया-चित्रांवर आधारित एक नकाशाचें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. उपग्रहानें पाठविलेल्या संदेशांचा अर्थ लावण्याच्या कामीं अनेक शास्त्रज्ञांना सहकार्य करावें लागलें.

**शास्त्रीय संशोधकांना अधिक पगार**—भारत सरकारच्या शास्त्रीय संशोधन व सांस्कृतिक खात्यानें शास्त्रीय संशोधन कर-णाऱ्या शास्त्रज्ञांच्या पगाराबद्दल फेरविचार करण्याविषयीं शिफारशी केल्या आहेत, त्या बहुधा मान्य होतील. सरकारच्या निरनिराळ्या खात्यांत व प्रयोगशाळांत मिळून सुमारें ७,००० शास्त्रिय नोकर काम करीत आहेत. त्यांना नव्या वेतनश्रेणीचा फायदा मिळेल.

**मागासलेल्या देशांना मदत**—जगांतील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना मदत करण्यासाठी एका विकास फंडाची स्थापना करण्यांत यावी असा ठराव संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक कमिटीपुढें मांडण्यांत आला आहे. ठरावाला आशिआ, आफ्रिका, युरोप व दक्षिण अमेरिका ह्यामधील ३२ देशांचा पाठिंबा आहे.

STURDY STABILIT

*Elegence* *Precision*




Great pyramids and sphynx in Eg) are a puzzle to the modern world. Th possess incredible intricacy of sturdin and craftsmanship. They stand centur together undamaged—Really a wonder. example for sturdiness. As well it is mi cleously intricated with craftsmansh Very few are the examples of such ty where sturdiness & elegance go hand in h

Similarly in machinery world of toda sturdiness and precision workmanship well needed. A slightest mistake in desi ing and workmanship means- an immeas rable loss of money, time and work.

*We stand for ....*

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

**For success**



**THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES**

GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Phone : 6640

Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.



श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांचे गुजराती अनुवाद

| सुखी जीवननी पगदंडी | सदाचारने पगले | मधुमालती |
|---|---|---|
| ( त्रिसरी आवृत्ति ) | ( दुसरी आवृत्ति ) | ( छापत आहे ) |
| [ कण आणि क्षण ] | [ पुढे पाऊल ] | [ तुमचें स्थान कोणतें ] |

# अर्थ

बुधवार, ता. १६ नोव्हेंबर १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनच्या आर्थिक प्रगतीचा मंद वेग

ब्रिटनमध्यें 'राजकीय व आर्थिक नियोजन' ह्या नांवाखाली काम करणारी एक संशोधन संस्था आहे. ह्या संस्थेतर्फे 'ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेचा विकास' ह्या विषयासंबंधीं एक अभ्यासपूर्ण अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अहवालांत ग्रथित केलेल्या माहितीवरून ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेचें आजचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहतें. आर्थिक विकासाच्या बाबतींत ब्रिटन हा देश बहुतेक पश्चिम युरोपीय देशांच्या मागें आहे. त्याच्या विकासाची गति ही ह्या देशांच्या मानानें मंद आहे. आर्थिक वाढीची गति अशीच कायम राहिल्यास ब्रिटनमधील राहाणीचें मान पश्चिम युरोपांतील देशांच्या तुलनेनें पुढील कांहीं वर्षांत कमी प्रतीचें झाल्याशिवाय राहणार नाहीं. अहवालांत पश्चिम युरोपीय देशांपैकीं ९ देशांसंबंधीं कोष्टकें देण्यांत आलीं आहेत. ह्या कोष्टकांत ब्रिटनचा अनुक्रम खालून दुसरा लागतो. १९५२ ते १९५७ ह्या कालांत दरसाल झालेल्या भांडवल-गुंतवणुकीच्या संदर्भांत तर हें विशेषच खरें आहे. ब्रिटनमधील मंद आर्थिक गतीचें कारण काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. ह्या प्रश्नाचें एक संभाव्य उत्तर सुचवितांना अहवालांत असें म्हटलें आहे कीं, ब्रिटिश अर्थव्यवस्थेची संघटना विकासाची जलद गति साधण्यासाठी करण्यांत आलेली नसावी. विकासाची जलद गति प्राप्त करून घेण्यापेक्षा पूर्ण रोजगारी, चलनवृद्धीचें निराकरण आणि परदेशीय देण्याघेण्यांत समतोलपणा, ह्या गोष्टींकडे अधिक लक्ष देण्यांत आलें पाहिजे.

आज ब्रिटनमध्यें भांडवल-गुंतवणुकीचें नियोजन जवळजवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. जे उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करण्यांत आले आहेत त्यांच्यांतील निकटच्या कारखान्यांतील भांडवल-गुंतवणुकीबाबतसुद्धां हेतूपूर्वक नियोजन दिसून येत नाहीं. खाजगी मालकीच्या धंद्यांत पोलादाचा धंदा सोडला तर भांडवल-गुंतवणुकीच्या नियोजनाचा संपूर्ण अभावच दिसून येतो. आर्थिक कारणांपेक्षा इतर कारणेंहि मंद गतीला पोषक झाल्यासारखी दिसतात. एकंदरीनें ब्रिटिश लोकांनाच आर्थिक प्रगतीविषयीं फारशी ओढ दिसत नाहीं. कारखान्यांचे चालक काय अगर कामगार काय, दोघेहि आर्थिक सुबत्तेला अग्रपूजेचा मान देतांना दिसत नाहींत. त्यामुळें अशा सुबत्तेसाठी कराव्या लागणाऱ्या कष्टाला ते प्रेरित होत नाहींत. ह्याच्या उलट स्थिति अमेरिका, पश्चिम जर्मनी व सोव्हिअट रशिआचा गट ह्यांत दिसून येते. ब्रिटिश कामगारांना आर्थिक सुबत्तेचें आमिष दाखविण्यांत आलें तरी सुबत्तेचा मोबदला म्हणून त्यांच्या सध्यांच्या स्थिर जीवनाची किंमत देण्याची त्यांची तयारी आढळून येत नाहीं. ब्रिटनमधील उद्योगधंद्यांत पुढाकार घेणाऱ्यांची वृत्तीहि द्रुतगतीच्या विकासाला अनुकूल नाहीं. आक्रमक वृत्तीचा, धडपडया व कांहींसा अस्वस्थ असलेला धंदेवाला आतां ब्रिटनमध्यें फारसा दिसून येत नाहीं. त्यापेक्षा थोडका पण निश्चित नफा मिळवावा आणि आयुष्य सुखासमाधानानें घालवावें, ह्या वृत्तीचे धंदेवाले अधिकाधिक दिसूं लागले आहेत.

---

## विजेच्या भारी यंत्रसामग्रीचे आणखी कारखाने

विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्याचा भारतामधील पहिला कारखाना भोपाळ येथें नुकताच सुरू झाला. अशाच प्रकारचे आणखी दोन कारखाने काढण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें असून त्यासाठी एक तांत्रिक कमिटी नेमली आहे. संकल्पित कारखान्यांपैकीं एक कारखाना दक्षिण भारतांत स्थापन करण्यांत येणार आहे. दक्षिण भारतामधील मद्रास, म्हैसूर, केरळ व आंध्र ह्या राज्यांचीं सरकारें हा कारखाना आपल्या राज्यांत निघावा म्हणून खटपट करीत आहेत. कारखान्याच्या उभारणीसाठी योग्य जागेची निवड करण्याच्या हेतूनें भारत सरकारची तांत्रिक कमिटी सध्यां दक्षिण भारताचा दौरा करीत आहे. आंध्र राज्याचा दौरा संपवून कमिटी लौकरच मद्रास राज्यांत दौऱ्यावर जाईल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत विजेच्या भारी यंत्रसामग्रीचा कारखाना मद्रास राज्यांत निघावा असे प्रयत्न त्या सरकारतर्फे करण्यांत आले होते. परंतु अखेर हा मान भोपाळला मिळाला. चारहि राज्यांनी आपआपल्या प्रदेशांतील कारखान्यास योग्य अशा जागा सुचविलेल्या आहेत. सर्व जागांची पाहणी करण्याचें काम तांत्रिक कमिटी करणार असून त्यासंबंधीचा आपला अहवाल मध्यवर्ती सरकारला सादर करणार आहे. अशा प्रकारच्या कारखान्याला पाण्याचा मुबलक पुरवठा लागतो. मद्रास सरकारनें शहरापासून ३० मैलांवरील एक ठिकाण कारखान्याच्या जागेसाठी सुचविलें होतें. परंतु ह्या ठिकाणीं पाण्याचा विपुल पुरवठा होण्यासारखा नाहीं असें आतां निष्पन्न झालें आहे.

---

## हिंदी रेल्वे-कारखान्यांचे निर्यातीचे प्रयत्न

गेल्या दहा वर्षांच्या कालांत हिंदमधील रेल्वेखात्यानें बरीच प्रगति केलेली असून आतां रेल्वेच्या कारखान्यांकडून माल निर्यात करण्याचेहि प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारताच्या शेजारी देशांना वाफेचीं एंजिनें, प्रवासी डबे, सिग्नलिंगसाठी लागणारें साहित्य, इत्यादि माल आतां रेल्वेचे कारखाने पुरवूं शकतील. इतकेंच काय पण रेल्वेमार्ग बांधण्याचें कामहि हिंदी रेल्वेखातें करूं शकेल. आशिआ रेल्वे कॉन्फरन्स ह्या नव्यानें स्थापन करण्यांत आलेल्या संघटनेचें पुढील अधिवेशन दिल्ली येथें भरविण्याचे प्रयत्न चालू आहेत ही गोष्ट ह्या दृष्टीनें सूचक आहे. आग्नेय आशिआ आणि पश्चिम आशिया ह्या भागांतून अनेक रेल्वे-प्रतिनिधी मंडळें परिषदेच्या निमित्तानें भारतांत येण्याचा संभव आहे. ह्या प्रतिनिधी मंडळांना भारतीय रेल्वेनें केलेल्या तांत्रिक प्रगतीची माहिती अनायासें पाहण्यास मिळणार आहे. भारताच्या शेजारी देशांना अद्याप ह्या प्रगतीची कल्पना नाहीं. ब्रह्मदेश, इंडोनेशिआ, इराण, इत्यादि देशांना भारत वाफेचीं एंजिनें पुरवूं शकेल. पण ह्या देशांना वाफेच्या एंजिनांबद्दल फारशी आस्था नाहीं. कारण ह्या देशांतून खनिज तेल मोठ्या प्रमाणावर सांपडतें. अर्थातच वाफेवर चालणाऱ्या एंजिनांपेक्षा तेलावर चालणाऱ्या इंजिनांविषयीं त्यांना अधिक आस्था आहे. भारत सरकारनें

तेथवर चालणारीं रेल्वे-एंजिनें तयार करण्याचा सार्वजनिक मालकीचा कारखाना स्थापन करण्याचा निर्णय अलीकडे घेतला आहे. भारतामधील रेल्वेच्या डब्यांच्या कारखान्यांतून तयार होणारे डबे आतां परदेशांच्या तोडीचे तयार होऊं लागले आहेत. त्यांना निर्यात बाजारपेठ मिळूं शकेल.

---

## श्री लक्ष्मी सेंट्रल को. बँकेचें नॉर्थ सातारा बँकेंत विलीनीकरण

फलटण येथील श्री लक्ष्मी सेंट्रल को. बँकेचें सातारा येथील नॉर्थ सातारा बँकेंत विलीनीकरण करावें असा निर्णय महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री श्री. बाळासाहेब भारदे व फलटण तालुक्यांतील प्रमुख सहकारी कार्यकर्ते यांच्या बैठकींत १८ ऑक्टोबर रोजीं घेण्यांत आला.

महाराष्ट्रांत निरनिराळ्या ठिकाणीं तालुक्यामध्यें सहकारी बँका काम करीत होत्या. या सर्व बँकांच्या कारभारांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व कामाची विभागणी योग्य पद्धतीनें व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारनें फक्त जिल्ह्याच्या ठिकाणींच एक सहकारी बँक असावी असें आपले धोरण जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रांतील सर्व तालुका-बँकांचें जिल्हा बँकेंत विलीनीकरण दोन वर्षांपूर्वी केलें होतें. फक्त फलटण येथील श्री लक्ष्मी बँक या नियमास अपवाद म्हणून काम करीत होती. या बँकेचेंहि विलीनीकरण करावें अशी सरकारची इच्छा होती. सरकारची भूमिका समजावून देण्याकरितां नामदार श्री. भारदे फलटणला आले होते. त्याप्रमाणें त्यांनीं दोन्ही बँकांच्या पदाधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करून सदर बँक मार्च महिना-अखेर नॉर्थ सातारा बँकेंत विलीन करावी असा निर्णय दिला आहे. त्यामुळें गेलीं दोन वर्षे चाललेल्या वाटाघाटींवर आतां कायमचा पडदा पडलेला आहे. कार्यकर्त्यांच्या बैठकींत कांहीं ठोकळ निर्णय घेण्यास आले आहेत. त्याचा तपशील असा आहे :—(१) ही बँक नॉर्थ सातारा बँकेची शाखा म्हणून फलटण येथें काम करील. (२) तालुक्याकरितां २५ लाख रुपये कर्ज वांटण्याकरितां चालू वर्षी मंजूर करावेत. यामध्यें वाढ झाल्यास आणखी रक्कम मंजूर करावी. (३) कर्ज वांटपाकरितां ९ जणांची एक कामिटी असावी. (४) बँकेनें आज मंजूर केलेलें कर्ज तीन महिन्यांच्या आंत वाटावें (५) लक्ष्मी बँकेचे दोन प्रतिनिधी नॉर्थ सातारा बँकेवर असावेत. (६) सध्यां कामावर असलेल्या बँक-नोकरांना नॉर्थ सातारा बँकेंत समाविष्ट करून घ्यावें. (७) त्यांच्या पगाराचें प्रमाण नॉर्थ सातारा बँकेप्रमाणें असावें परंतु ज्यांचे पगार नॉर्थ सातारा बँकेपेक्षा जास्त असतील त्यांत कपात करूं नये. (८) बँकेच्या सर्व जिंदगी-मालमत्तेची मोजदाद करून बँकेचा सर्व कारभार मार्च अखेर नॉर्थ सातारा बँकेच्या स्वाधीन करावा.

---

**साखरेची खुली विक्री**—पंजाब सरकारनें आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या केंद्रांतून साखरेची खुली विक्री करण्याचें ठरविलें आहे. सरकारच्या अधिकृत विक्रेत्यांकडून आतां कोणालाहि पाहिजे तेवढी साखर घेतां येईल. साखरेचा भाव दर शेराला १ रु. १० नये पैसे ठेवण्यांत आला आहे.

**धान्य साठविण्याची सोय**—कांडला बंदरानजीक अमेरिकेहून आयात करण्यांत येणारें धान्य साठविण्यासाठी एक मोठें गुदाम बांधण्यांत येणार आहे. गुदाम बांधण्यासाठी सुमारें २ कोटी रुपये खर्च येईल. तें अद्यावत् पद्धतीचें असेल. गुदामांत २० लाख टन अन्नधान्य सांठवितां येईल.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या कार्याचा आढावा

३० जून, १९६० रोजीं संपलेल्या वर्षी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें एकूण १७·९२ कोटी रु. चीं कर्जें मंजूर केलीं. कॉर्पोरेशनच्या गेल्या बारा वर्षांच्या इतिहासांत एवढ्या मोठ्या रकमेचीं कर्जें ह्यापूर्वी कोणत्याच वर्षी मंजूर करण्यांत आलीं नव्हतीं. गेल्या तीन वर्षांतील कर्जाच्या अर्जांची विल्हेवाट खालीलप्रमाणें झाली :—

### कर्जाच्या अर्जांची विल्हेवाट

| | संख्या | ३०–६–५८ अखेरचें वर्ष रक्कम (हजार रु.) | संख्या | ३०–६–५९ अखेरचें वर्ष रक्कम (हजार रु.) | संख्या | ३०–६–६० अखेरचें वर्ष रक्कम (हजार रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ आलेले अर्ज | ४८ | १४,८८,५० | २६ | ११,१६,५७ | ३८ | १७,५४,१० |
| २ मंजूर केलेले अर्ज | २२ | ७,७८,५० | १९ | ३,७९,०० | २९ | १७,९१,७४ |
| ३ दिलेलीं कर्जें | | ८,३३,३५ | | ७,४७,७१ | | ८,४०,८१ |
| ४ नामंजूर अर्ज | १ | १०,०० | ३ | ३१,५० | १ | ४०,०० |
| ५ रद्द किंवा परत घेतलेले अर्ज | १० | २,११,५० | २२ | ९,७९,५० | ६ | ३,५०,०० |
| ६ विचार चालू असलेले अर्ज | ४१ | १४,९८,४० | २३ | ११,७०,९७ | २५ | ७,८८,१० |

### सरकारी संमति

अहवालाचे वर्षी मंजूर झालेल्या १७,९१,७४,००० रुपयांच्या कर्जांपैकी १६,२०,२४,००० रुपयांच्या कर्जांस सरकारची संमति आवश्यक होती. ३० जून, १९६० पूर्वी ६·२८ कोटी रुपयांच्या १३ कर्जांस सरकारी संमति मिळाली; त्यानंतर १·१५ कोटी रुपयांच्या दोन कर्जांस मिळाली; ८·७७ कोटी रुपयांच्या उरलेल्या पांच कर्जांस अद्याप संमति मिळालेली नाहीं. ७,५२,२४,००० रुपयांच्या तीन कर्जांस २४ व्या कलमान्वयें सरकारची हमी लागेल; तीहि अद्याप यावयाची आहे.

### अर्जदार कारखाने

अहवालाच्या वर्षांत १७,५४,१०,००० रुपयांच्या कर्जांसाठी ३८ अर्ज आले. त्यांपैकी ६·२५ कोटी रुपयांचे ११ अर्ज साखरेच्या कारखान्यांचे, २·७४ कोटी रुपयांचे तीन अर्ज होटेलच्या धंद्याचे, २८·२५ लक्ष रु. चे दोन अर्ज कापड-गिरण्यांचे, ३ कोटी रु. चा एक अर्ज रेयॉनच्या गिरणीचा आणि ५० लक्ष रु. चा एक अर्ज कागदाच्या गिरणीचा होता. बाकीच्या ४·७७ कोटी रु. चे २० अर्ज सिमेंट, रसायनें, रबर, काच, इत्यादि कारखान्यांचे होते. साखरेच्या कारखान्यांच्या ६·२५ कोटी रु. च्या ११ अर्जांपैकी ६·०० कोटी रु. चे १० अर्ज सहकारी सोसायट्यांकडून आले होते.

### २३% कर्जें सहकारी सोसायट्यांना

अहवालाचे वर्षी ४·२० कोटी रु. चीं आठ कर्जें सहकारी सोसायट्यांना देण्यांत आलीं; तीं सर्व साखरेच्या कारखान्यांसाठी होतीं. म्हणजे, वर्षअखेर एकूण १९·१४ कोटी रुपयांचीं कर्जें

आजवर सहकारी सोसायट्यांना देण्यांत आलेलीं आहेत; त्यांपैकी १८·८९ कोटी रुपयांचीं कर्जें ३२ सहकारी साखर कारखान्यांच्या वांट्यास आलेलीं आहेत. कॉर्पोरेशननें आजवर मंजूर केलेल्या कर्जांपैकी २३% कर्जें सहकारी उपक्रमांसाठी आहेत; ह्यावरून सहकारी सोसायट्यांना खास प्रोत्साहन देण्याचें सरकारी धोरण कॉर्पोरेशन कसें अंमलांत आणीत आहे, हें दिसून येईल.

### मंजूर व दिलेलें कर्ज

खालील तक्त्यांत १९४९ पासून १९६० अखेरचीं मंजूर कर्जें, प्रत्यक्ष दिलेलीं कर्जें, आलेले अर्ज व मंजूर अर्ज, ह्यांचे आंकडे दिले आहेत :—

| ३० जून अखेर | मंजूर कर्जें | दिलेलीं कर्जें | आलेले अर्ज | मंजूर अर्ज |
|---|---|---|---|---|
| | (कोटी रु.) | (कोटी रु.) | | |
| १९४९ | ३·४२ | १·३३ | ९५ | २१ |
| १९५० | ७·१९ | ३·४१ | १६० | ४४ |
| १९५१ | ९·५७ | ५·७९ | २०५ | ६१ |
| १९५२ | १४·०३ | ७·५७ | २५९ | ९४ |
| १९५३ | १५·४७ | १०·०७ | ३३३ | १०८ |
| १९५४ | २०·७४ | १२·८९ | ३७६ | १३७ |
| १९५५ | २८·०८ | १४·५३ | ४२२ | १६४ |
| १९५६ | ४२·२१ | १६·७३ | ५०८ | २०८ |
| १९५७ | ५५·१२ | २६·५१ | ५७५ | २५९ |
| १९५८ | ६२·९० | ३४·८४ | ६२३ | २८१ |
| १९५९ | ६६·६९ | ४२·३२ | ६४९ | ३०० |
| १९६० | ८४·६१ | ५०·७३ | ६८७ | ३२९ |

### तरतुदीचा हिशेब

कॉर्पोरेशनला किती रकमेची तरतूद करायला हवी, हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल :—

| | रु. | रु. |
|---|---|---|
| एकूण मंजूर कर्जें | | ८४,६०,७४,००० |
| वजा दिलेलीं कर्जें | ५०,७२,५७,००० | |
| न घेतलेलीं किंवा न द्यावयाचीं कर्जें | १०,९५,३५,००० | |
| सरकारी मंजुरीची वाट पाहत असलेलीं कर्जें | १०,४२,२४,००० | |
| | | ७२,१०,१६,००० |
| तरतुदीची रक्कम | | १२,५०,५८,००० |

अहवालाचे वर्षीं ८·४१ कोटी रु. चीं कर्जें प्रत्यक्ष दिलीं गेलीं. गेल्या वर्षींचा तत्सम आंकडा ७·४८ कोटी रु. होता; दिलेल्या कर्जांची १९४९ ते १९५८ ची वार्षिक सरासरी ३·४८ कोटी रु. होती.

### मुद्दलाची व व्याजाची वसुली

कॉर्पोरेशनच्या स्थापनेपासून आतांपर्यंत, कर्जांवरील येणें व्याज ९,२१,३४,५४८ रु. होतें, त्यांपैकी, ९,१०,५७,९९७ रु. व्याज प्रत्यक्ष वसूल झालें. म्हणजे फक्त १·२% व्याज वसूल झालें नाहीं. येणें भांडवलाची रक्कम ७,१२,३३,६३६ रु. होती, त्यांपैकी फक्त ४·३% रक्कम वसूल झालेली नाहीं. थकबाकी करणारे मुख्यतः चार कारखाने आहेत.

कॉर्पोरेशनचा व्यांजाचा दर ७% कायम आहे; वक्तशीर परतफेडीला अर्धा टक्का रिबेट मिळतो.

### वाढतें उत्पन्न, उतरता व्यवस्थाखर्च

कॉर्पोरेशनचें वाढतें उत्पन्न आणि व्यवस्था खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं घटतें प्रमाण खालील तुलनात्मक आंकडे स्पष्ट करतील :—

| ३० जून अखेरचें वर्ष | एकूण उत्पन्न ( लक्ष रु. ) | व्यवस्थाखर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % |
|---|---|---|
| १९४९ | ५·७३ | ५०·०९ |
| १९५० | २३·४७ | २०·३७ |
| १९५१ | ३५·८७ | १४·०२ |
| १९५२ | ४२·०५ | १३·५६ |
| १९५३ | ४९·३० | १३·७१ |
| १९५४ | ५४·७४ | १३·४६ |
| १९५५ | ६०·७१ | १५·६५ |
| १९५६ | ६७·६३ | ११·७४ |
| १९५७ | ९६·३३ | ९·४५ |
| १९५८ | १५४·९१ | ६·३२ |
| १९५९ | २०३·८८ | ५·११ |
| १९६० | २५०·८८ | ४·६६ |

### भागांची वांटणी

कॉर्पोरेशननें ३० जून १९५९ अखेरच्या गेल्या ११ वर्षांत एकूण १,२६,३१,५४६ रु. इनकम टॅक्स दिला आहे. कॉर्पोरेशननें २½% डिव्हिडंडची हमी घेतलेली आहे ती पार पाडतां येण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें आतांपर्यंत ५३,४५,४९० रु. उसने दिले. त्यांपैकी सुमारें निम्मी रक्कम फेडण्यांत आली आहे. कॉर्पोरेशनच्या भागांची वांटणी खालीलप्रमाणें आहे :—

| | |
|---|---|
| मध्यवर्ती सरकार | २,००० |
| रिझर्व्ह बँक | २,०५४ |
| शेड्यूल्ड बँका | २,४०५ |
| विमा कंपन्या, इ. | ३,५९६* |
| सहकारी बँका | ९४५ |
| | १०,००० |

*त्यांपैकी २,३७६ भाग लाइफ इं. कॉर्पोरेशनकडे आहेत.

**गुजरातची धरणयोजना**—गुजरात सरकारनें बानसकंठा जिल्ह्यांत दंतीवाडा ह्या ठिकाणीं एक धरण बांधण्याचें ठरविलें असून ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारची मंजुरी मिळाली आहे. संकल्पित धरणांत १६४० कोटी घनफूट पाणी सांठवितां येईल व त्याचा उपयोग करून १ लाखावर एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा करतां येईल.

**दोन नवीं कॉलेजें**—पुढील शैक्षणिक वर्षापासून अमरेलीचें एक आर्टस् व एक सायन्स कॉलेज सुरू होणार आहे. कॉलेजांच्या स्थापनेसाठी २० लाख रुपये जमविण्यांत आले असून जागा मिळविण्याची खटपट चालू आहे. अमरेली एज्युकेशन सोसायटीनें ६० एकर जागा मिळविली आहे. आणखी २० एकर जागा सरकारकडून मिळणार आहे.

## " कंपनीची नोकरासंबंधीं चौकशी फौजदारी कोर्टाच्या निवाड्यापर्यंत तहकूब ठेवण्याचें बंधन नाहीं "

### ( सुप्रीम कोर्टाचा निवाडा )

देहली क्लॉथ ॲण्ड जनरल मिल्स लिमिटेड या कंपनींत खुशालभान हा चपराशी म्हणून नोकरीला होता. २४ ऑगस्ट १९५७ ला रामचंद्र नांवाच्या एका हेडक्लार्कची सायकल चोरीला गेली, त्यानंतर कांहीं दिवसांनीं रेल्वेस्टेशन सायकल स्टँड जवळून खुशालभाननें ती सायकल पोलीसांच्या हवाली केली. ही गोष्ट कंपनीला माहीत झाल्यावर कंपनीनें खुशालभानवर गैरवर्तणुकी-बाबत आरोपपत्र तामील करून चौकशी चालविली. त्यांत त्यानें रामचंद्राची सायकल चोरली आणि चोरीबाबत पोलीसांनीं त्याचेवर खटला भरलेला आहे याप्रमाणें त्याच्यावर आरोप लावले. खुशालभाननें त्याच्यावर लादलेले आरोप नाकबूल केले. त्यानंतर ता. १४-११-१९५७ ही चौकशीची तारीख मुकरर झाली होती. खुशालभाननें त्या तारखेला चौकशी अधिकाऱ्यासमोर अशी हरकत घेतली की, कोर्टांतून त्याचेवर फौजदारी खटला भरला असून त्यांत निकाल न लागल्यामुळें तो चोरीच्या आरोपाविरुद्ध कोणताहि पुरावा देऊं शकत नाहीं. जोपर्यंत कोर्टाचा निकाल होत नाहीं तोपर्यंत तो चौकशींत भाग घेऊं इच्छित नाहीं. त्याचप्रमाणें तो कोणतेंहि बयाण दाखल करूं शकत नाही. त्यावर कंपनीनें विभागीय चौकशी पूर्णपणें चालवून त्याला नोकरीवरून काढण्याबाबत हुकूम दिला. त्यानंतर कंपनीनें इंडस्ट्रिअल ॲक्टच्या, क. ३३ ( २ ) खाली ट्रिब्यूनलकडे अर्ज करून खुशालभानला नोकरीवरून काढण्याबाबत दिलेला हुकूम मंजूर केला जावा म्हणून मागणी केली. त्यांत ट्रिब्यूनलकडे ता. ६-५-१९५८ ला सुनावणी तारीख मुकरर झाली होती. पण त्यापूर्वी खुशालभानवर भरलेल्या फौजदारी खटल्याचा निकाल होऊन तो निर्दोषी ठरविला गेला. त्यानें फौजदारी खटल्याच्या निकालाची तारीख ट्रिब्यूनलला दाखविली. त्यावर ट्रिब्युनलनें खुशालभानला नोकरीवरून काढण्या-बाबत दिलेला हुकूम नामंजूर केला. त्यावर कंपनीनें सुप्रीम कोर्टांत हें अपील दाखल केलेलें आहे.

प्रस्तुतच्या अपिलांत इंडस्ट्रियल ट्रिब्युनलनें कंपनीचा खुशाल-भानला नोकरीवरून काढून टाकण्याचा हुकूम जो नामंजूर केला तो बरोबर आहे कीं काय ? तें आपल्याला पाहावयाचें आहे.

कंपनीतर्फे करण्यांत आलेल्या युक्तिवादांतून असें सांगण्यांत आलें आहे कीं, कंपनीनें विभागीय चौकशी चालविल्यानंतर फौजदारी कोर्टाचा निकाल होतपर्यंत ती तहकूब ठेवूं शकली जाणार नाहीं. त्याचप्रमाणें फौजदारी कोर्टाचा निकाल न झाल्या-मुळें खुशालभाननें चौकशीसमोर भाग न घेण्याची जी वर्तणूक केली ती बरोबर नाही आणि त्याच्या अनुपस्थितींतहि कंपनीला त्याच्यावर चौकशी चालवितां येऊन तो चौकशी अधिकाऱ्यानें दिलेल्या हुकुमाला बंधनकारक राहील. उलटपक्षी खुशालभान-तर्फे केलेल्या युक्तिवादांतून असें सांगण्यांत आलें आहे कीं, कोर्टांत फौजदारी खटला चालू असतांना त्यांत अखेरचा निकाल होतपर्यंत चौकशी तहकूब ठेवणें हें न्यायतत्त्वांना धरून होईल. कोर्टाचा निकाल न झाल्यामुळें खुशालभाननें चौकशींत भाग घेण्याचें जें नाकबूल केलें तें कायदेशीर होतें. कंपनीनें नोकरावर चौकशी चालविल्यानंतर फौजदारी कोर्टाचा निकाल होण्यापूर्वी तिनें चालविलेली चौकशी ही न्यायतत्त्वांना सोडून होईल असें नाहीं. एखाद्या विशिष्ट केसमध्यें वस्तुस्थितीचें किंवा कायद्याचे गंभीर प्रश्न उपस्थित झाल्यास फौजदारी कोर्टाचा निकाल होतपर्यंत ती स्थगित ठेवण्याला बांधलेली नाहीं. फौजदारी कोर्टाचा निकाल होईपर्यंत कंपनीनें चालविलेली चौकशी ही स्थगित ठेवणें हें इष्ट ठरविलें जाईल. पण प्रस्तुतच्या केसमधील घटना या अत्यंत साधारण स्वरूपाच्या असून फौजदारी कोर्टाचा निकाल होतपर्यंत कंपनीला चौकशी तहकूब ठेवण्याचें कारण नाहीं. कंपनीनें केलेल्या चौकशींत खुशालभाननें भाग घेण्याचें नाकारलें आहे. तेव्हां चौकशींत दिलेला हुकूम त्याच्यावर बंधनकारक असल्याचें ठरविलें जाईल. अशा परिस्थितींत इंडस्ट्रिअल डिस्प्यूट ॲक्टच्या क. ३३ ( २ ) खाली ट्रिब्युनलनें कंपनीचा हुकूम नामंजूर करण्यांत चूक केली आहे असें आम्ही ठरवितों. ट्रिब्युनलनें दिलेला हुकूम चुकीचा असल्यामुळें आम्ही तो रद्द करतो, आणि कंपनीनें खुशालभानला नोकरीवरून काढण्याबाबत दिलेल्या हुकूमाला मंजुरी मिळण्याबाबत जी मागणी केलेली आहे ती मंजूर करतों.

वरील कारणास्तव देहली क्लॉथ ॲन्ड जनरल मिल्स लिमिटेड कंपनीतर्फे ह्या ठिकाणीं दाखल झालेलें हें अपील आम्ही मंजूर करतों.

**सारांश**—कंपनींत काम करणाऱ्या नोकरावर चोरीबाबत फौजदारी कोर्टांतून खटला भरल्यास आणि तो चालू असतांना कंपनीतर्फे नोकरांवर गैरवर्तणुकीखालीं आरोपपत्र तामिल होऊन त्याच्यावर कंपनीतर्फे चौकशी चालू झाल्यास फौजदारी खटल्याचा निकाल होतपर्यंत ती चौकशी तहकूब ठेवण्याला कंपनी बांधली राहणार नाहीं. फौजदारी कोर्टाचा निकाल होतपर्यंत ती चौकशी तहकूब ठेवावी अशी नोकरानें मागणी करून त्यानें त्यांत भाग न घेतल्यास आणि कंपनीनें चौकशीचें काम चालवून नोकराला गैरवर्तणुकीखालीं दोषी ठरविल्यास कंपनीचा तो हुकूम कायदेशीर असल्याचें ठरविलें जाईल. —न्यायबोध

## पुणें सें. को. बँकेच्या सहकारी सप्ताहाचा समारोप

" विश्वास हा सहकारी चळवळीचा मुख्य आधार आहे. सहकारी चळवळीचें पावित्र्य राखावयाचें असेल तर चातुर्यापेक्षा चारित्र्याची आज मुख्य जरूर आहे. " असे उद्गार सहकारी खात्याचे डेप्युटी रजिस्ट्रार श्री. पी. व्ही. पाटील यांनीं सहकारी चळवळीचे समारोपप्रसंगीं काढले.

सहकारी सप्ताहाचा समारोप पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या सभागृहांत पुणें सेंट्रल को-ऑप. बँक, पुणें जिल्हा सहकारी संघ लि., जिल्हा सहकारी बोर्ड व पूना अर्बन बँक्स असोसिएशन या संस्थांच्या वतीनें साजरा करण्यांत आला.

एकूण १७ नवीन सोसायट्या स्थापन झाल्या. त्यांचीं रजिस्ट्रे-शन सर्टिफिकेट्स् व ९ सोसायट्यांना गुदामाकरितां मंजूर झालेल्या कर्जाचीं आदेशपत्रकें अध्यक्षांचे हातुन देण्यांत आलीं.

पुणें सेंट्रल को-ऑप. बँक लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वा. ग. अळतेकर यांनीं सहकारी सप्ताह कोठें कोठें कसा साजरा झाला याची माहिती दिली. श्री. भिडे, आय. सी. एस्., श्री. मु. सा. काकडे, श्री. द. दि. चितळे व सहकारी खात्याचे डेप्युटी रजिस्ट्रार श्री. गोसावी यांचीं भाषणें झालीं. बँकेचे उपाध्यक्ष श्री. शि. भि. निंबाळकर यांनीं आभार मानले.

## साखरेच्या उत्पादनाचा उच्चांक

भारतांत १९५९-६० मध्यें यापूर्वी कधींहि झालेल्या उत्पा-दनापेक्षा अधिक म्हणजे २४ लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें आहे. तिसऱ्या योजनेसाठीं ३० लक्ष टन पांढऱ्या साखरेचें व ६० लक्ष टन गूळ व खांडसरीचें उत्पादन लक्ष्य संकल्पिण्यांत आलें आहे.

## सहकारी कायद्याचें ५४ वें कलम

### नोकर व औद्योगिक कलह कायदा

मुलुंड येथील ॲस्बेस्टॉस सिमेंट सहकारी सोसायटी (लि.) ह्या सोसायटीनें भारतीय घटनेच्या आर्टिकल २२६ प्रमाणें महाराष्ट्र हायकोर्टात दाखल केलेला "रीट" अर्ज नामंजूर करतांना न्यायमूर्ति पटवर्धन व तारकुंडे यांनीं निकालपत्रांत लिहिलें आहे कीं, मुंबई सहकारी सोसायट्यांचा कायदा कलम ५४ चा उद्देश त्या कलमांत उल्लेखिलेल्या संबंधींत लोकांचे दिवाणी स्वरूपाचे तंटे मिटविण्याचा आहे. औद्योगिक कलहाच्या कायद्यासारख्या कायद्यांतील तरतुदींचा प्राथमिक हेतु औद्योगिक शांतता राहावी असा असून त्यासाठी जरूर पडल्यास त्यांना कराराच्या शर्ती वा कायद्यांतील हक्कांच्या व कर्तव्याच्याहि पलीकडे जातां येतें. रेस्पॉंडंट नं. ३ अपेलन्ट सोसायटीच्या कामगारांची संघटना आहे व त्यांनीं १९५५ ते १९५७ व १९५७ ते १९५८ च्या बोनसची मागणी केली आहे व हा वाद औद्योगिक कलह कायद्याप्रमाणें कन्सिलिएशन ऑफिसरकडे निर्णयासाठी सोपवला होता. दि. १३ जुलै १९५९ ला कन्सिलिएशन ऑफिसरनें ह्या वादांत तडजोड होऊं शकत नाहीं, असें सरकारला कळविलें. मध्यंतराचे काळांत सोसायटीनें सहकारी सोसायटी कायदा कलम ५४ प्रमाणें रजिस्ट्रारकडे चौकशी केली होती व त्यांत सदरील संघटनेला औद्योगिक कलह कायद्याच्या आधारें बोनसची कारवाई करतां येत नाहीं असें प्रतिवादन केलें होतें. हा तंटा रजिस्ट्रार ह्यांनीं त्यांचे नॉमिनी ह्यांचेकडे पाठविला असतां त्यांनीं दि. २४ आक्टोबर १९५९ ला ॲवार्ड केलें त्यांत सदरील संघटनेला औद्योगिक कलह कायद्याप्रमाणें बोनस मागतां येत नाहीं. सबब त्यांनीं त्या कायद्याखालील कारवाई थांबवावी असा निर्णय दिला.

दि. २७ आक्टोबर १९५९ रोजीं मुंबई सरकारनें हा प्रश्न औद्योगिक लवाद (Industrial Tribunal) श्री. आय. सी. ठाकोर ह्यांचेकडे सोपविला. त्यानंतर सोसायटीनें सरकारचा हा हुकूम रद्द करण्यासंबंधी अर्ज दिला. त्यांत सरकार असा अर्ज करूं शकत नाहीं व तो कायदेशीरहि नाहीं असा मुद्दा मांडला. सोसायटीचें म्हणणें असें कीं सहकारी सोसायटीचे बाबतींत नोकर व सोसायटी ह्यांचेमधील सोसायटीच्या संबंधित कोणताहि तंटा निर्माण झाल्यास तो क. ५४ प्रमाणें म. रजिस्ट्रारकडे वा त्यांचे नॉमिनीकडे पाठवावयास पाहिजे.

दिलेल्या निकालांत महाराष्ट्र हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणतात कीं, कायदेशीर कराराच्या शर्तीव्यतिरिक्त वा कायद्याच्या बंधनाव्यतिरिक्त असलेल्या नोकरांच्या मागण्यामुळें जर औद्योगिक कलह निर्माण झाला असेल तर तो सहकारी सोसायटी कायद्याच्या कलम ५४ खाली येऊं शकत नाहीं. सोसायटीच्या नोकरांनीं केलेली बोनसची मागणी ही सोसायटी व तिचे नोकर ह्यांच्या कराराच्या शर्तीच्या बाहेरची आहे व त्यामुळें ती दिवाणी कोर्टाच्या मर्यादेंत नामंजूर होणारी आहे. परंतु औद्योगिक कलहाचे लवाद यांनीच अशा तऱ्हेच्या कराराच्या शर्तीच्या व कायद्याच्या शर्तीच्या बाहेरचे हे औद्योगिक कलह सोडवावयालाच पाहिजे व नेहमीं सोडवावेत.

न्यायमूर्तींनीं त्यामुळें असा निर्णय दिला कीं, कामगार संघटनेनें केलेली बोनसची मागणी रजिस्ट्रारकडे वा त्यांच्या नॉमिनीकडे सहकारी सोसायटी कायद्याच्या कलम ५४ प्रमाणें नेण्याची बाब नाहीं व म्हणून सोसायटीचा अर्ज नामंजूर केला.

(—सहकार-शक्ति)


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारली जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारली जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष
रावसाहेब य. द. खोले
श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंद्रुके

## भारताच्या औद्योगिक नियोजनाचे द्रष्टे

# डॉ. विश्वेश्वर अय्या

लेखक : श्री. श्री. वा. काळे

डॉ. मोक्षगुंडम् विश्वेश्वरअय्या ह्यांचा १०० वा वाढदिवस १५ सप्टेंबर रोजीं भारतांत सर्वत्र साजरा झाला. बंगलोर येथील समारंभास पंत प्रधान पं. नेहरू हे उपस्थित होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले, "आपल्या देशांतील लोक खूप बोलतात, पण त्या मानानें कांहींच कृति होत नाहीं. डॉ. विश्वेश्वर अय्या हे त्याला अपवाद आहेत; ते बोलले असतील थोडें पण त्यांची कृति मोठी आहे." भारताला सत्वर प्रगति करायची असेल, तर नियोजनपूर्वक औद्योगीकरण केलें पाहिजे असें त्यांचें ठाम मत होतें आणि आहे. आणि त्यासाठीं त्यांनीं दूरदृष्टीनें कार्य केलें. भारताच्या औद्योगिक नियोजनाचे ते द्रष्टे होते; त्यांच्या कल्पनांना येत असलेलें मूर्त स्वरूप त्यांना पाहावयास मिळत आहे.



डॉ. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं म्हैसूर संस्थानाचा औद्योगिक व इतर दृष्ट्या कायापालट केला; म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स, दि बँक ऑफ म्हैसूर (आतां दि स्टेट बँक ऑफ म्हैसूर) भद्रावती येथील आयर्न अँड स्टील वर्क्स, कन्नड साहित्य संघ, कृष्णराज सागर योजना, ह्या सर्वांचें श्रेय डॉ. विश्वेश्वर अय्या ह्यांनाच आहे. त्यांच्या तज्ज्ञ सल्ल्याचा आणि अनुभवाचा फायदा भारतांतील पुष्कळ वास्तुशास्त्रीय योजनांना झाला आहे. शेतीचा लहान आणि मोठ्या उद्योगधंद्यांशीं संबंध जोडण्याचा आग्रह त्यांनीं धरला. त्यांनीं भारतीयांच्या राहणीच्या दर्जांत वाढ घडवून आणण्याचे कामीं महत्त्वपूर्ण कामगिरी केली. पण, त्यांच्या विशाल दृष्टिकोणाला जी व्यावहारिक बुद्धीची जोड मिळाली; देशसेवेसाठीं त्यांनीं स्वतःला ज्या प्रकारें वाहून घेतलें; ज्या साधेपणाचा आणि सौजन्याचा त्यांनीं राष्ट्रीय जीवनांत आदर्श निर्माण केला, त्याचें महत्त्व असामान्य आहे. त्यांनीं स्वाभिमान कधींहि सोडला नाहीं, हेंहि त्यांचें वैशिष्ट्य आहे.

डॉ. विश्वेश्वरअय्यांचे विचार आपणां सर्वांना मोलाचे वाटतील, ह्यांत शंका नाहीं. ते म्हणतात, "आजच्या ह्या यांत्रिक युगांत यंत्रें व यांत्रिक हत्यारें ह्यांचा आपण अधिकाधिक वापर केला पाहिजे. औद्योगीकरणामुळें रोजगार वाढतील आणि विधायक कार्याला वाव मिळेल. कुठलाहि व्यवसाय घ्या; चारित्र्य असलेला, स्पष्ट उद्देश समोर राखणारा, आवश्यक तें शिक्षण घेतलेला, धमक असलेला, पडतील ते कष्ट करण्याची पात्रता व तयारी असणारा, असाच मनुष्य यशस्वी होतो. परंपरागत पद्धतीनें जीवन कसें तरी जगणाऱ्या भारतीयांना सध्यांच्या स्पर्धामय काळांत टिकाव धरणें कठीण जात आहे; त्यांच्यांतील महत्त्वाकांक्षेचा अभाव ही मोठीच अडचण आहे. शिक्षणानें ती दूर केली पाहिजे.

"भारतांत कामाचे तास फार थोडे आणि तेहि अनिश्चित आहेत. लोकांना वक्तशीरपणा आणि शिस्त शिकवण्याची आवश्यकता आहे. एकता, सलोखा आणि सहकार्य हीं वाढीस लावलीं पाहिजेत. कामांत निर्दोषता राखण्याचें महत्त्व दाखवून दिलें पाहिजे. शाळांतून आणि विद्यापीठांतून कामाच्या चांगल्या सवयी दृढमूल करायला हव्यात; त्यांची चर्चा होऊन त्या सवयी अंगवळणी पडणें अगत्याचें आहे. वेळेचा सदुपयोग केला पाहिजे; वेळ वाया जाऊं देतां कामा नये. शिस्तबद्ध जीवनांत वेळ म्हणजेच पैसा होय. कष्टांतूनच संपत्ति निर्माण होते. प्रगतिपर पाश्चात्य देशांतील लोक श्रीमंत आहेत ह्याचें कारण ते कसून काम करतात किंवा त्यांच्या पूर्वजांनीं कसून काम केलें आहे."

डॉ. विश्वेश्वर अय्यांची भेट घ्यावयाची असली, तर त्याचा दिवस व वेळ खूप आधीं ठरवून घ्यावी लागते. भेटीची कालमर्यादा आणि चर्चेचा विषय हेहि निश्चित करावे लागतात. अशा रीतीनें ठरलेल्या भेटींत, डॉ. विश्वेश्वर अय्या आधीं कबूल केलेल्या विषयाखेरीज इतर विषयावर बोलण्यास तयार नसतात; ठराविक विषयापुरतेंच बोलणें मर्यादित करतात. भेटीची नियोजित कालमर्यादा संपली, कीं ते बोलणें व ऐकणें थांबवतात; उठून हस्तांदोलन करून वेळ संपल्याचें सुचवतात.

"तुमचें मन नेहमीं योग्य विचारांत गुंतवा. निजण्यापूर्वी मन स्वच्छ, निर्मळ करा; त्याला भटकूं देऊं नका. दररोज व्यायाम घ्या. मी दीड मैल तरी चालतों.

"एखादा आठवडा प्रयोग करून तो सोडून देणारेच बहुतेक असतात. एकदां निश्चय केल्यानंतर तो वरचेवर बदलण्याचा प्रयत्न करूं नका; निश्चयाप्रमाणें वागा. सबंध आठवड्याचें वेळापत्रक तयार करा आणि कामाला लागण्यापूर्वी दररोज तें नजरेखालीं घाला. जीवन शिस्तबद्ध असूं द्या आणि वक्तशीरपणा पाळा. कांहीं प्रश्न दीर्घकालीन असतात; कांहीं अल्पकालीन असतात. त्या त्या प्रमाणें ते सोडवावे लागतात. मी दररोज सकाळीं, दिवसांत पार पाडावयाचें काम ठरवून त्याची आंखणी करतों." डॉ. विश्वेश्वर अय्यांची कार्यपद्धति अशी शिस्तबद्ध असते.

चारित्र्य आणि सद्सद्विवेकबुद्धि ह्यांच्यावर डॉ. विश्वेश्वर अय्यांचा विशेष भर आहे. कमी वाचा, पण जें वाचाल तें लक्षांत ठेवा, असें त्यांचें सांगणें असतें. "दीर्घायुषी होण्याला कांहीं नियोजन आणि प्रयत्न ह्यांची आवश्यकता असते; केवळ नशिबावर अवलंबून भागत नाहीं. आरोग्य राखण्यासाठीं प्रयत्न करावा लागतो, दक्षता बाळगावी लागते, आणि शरीर व मन कार्यक्षम ठेवणें जरूर असतें. चैन आणि सुखें ह्यांचे बाबतींत संयम बाळगलेला बरा." असें त्यांनीं आपल्या दीर्घायुष्याचें रहस्य सांगितलें. डॉ. विश्वेश्वर अय्यांचा जन्म १८६० सालीं १५ सप्टेंबर रोजीं झाला. त्यांचें मन अजून ताजें आहे; शारीरिक आरोग्य चांगलें आहे.

—सृष्टिज्ञान'

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.